म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय ला. वा
दा. क्र. ३९६



# संत
# श्वर

BVBK-0400396

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. ३९६ दिनांक .......
विषय ...कथा-कथा... क्र. ..........

# संत ज्ञानेश्वर

मोरेश्वर माधव वाळिंबे

मूल्य दोन रुपये

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.

इंद्रायणी साहित्य प्रकाशन पुणे, ३०

BVBK-0400396

प्रकाशक
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
१२५७ सदाशिव पेठ, पुणे ३०

सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशन-दिनांक
विजया दशमी १९७५

मुद्रक
मधुकर बा. जोशी
ज्ञानविलास छापखाना
२७ बुधवार पेठ, पुणे २

# कुमारांचा आदर्श

माझे निकटवर्ती स्नेही श्री. मोरेश्वर माधव वाळिंबे यांनी लिहिलेले 'संत ज्ञानेश्वर' हे पुस्तक कुमार वाचकांसाठी पुरस्कृत करताना मला आनंद होत आहे. कुमारमन ज्या आदर्शवादाकडे आकर्षित व्हायला उत्सुक असते, असा आदर्शवाद ज्ञानदेवांच्या जीवनात अन् साहित्यात साकार झालेला आहे. ज्ञानदेवांनी बाल-वयात जे दारुण दुःख हसतमुखानं भोगलं, कुमारवयात जे अलौकिक कर्तृत्व गाजवलं अन् तरुणवयात प्रवेश केल्याबरोबर संजीवन-समाधी स्वीकारून जे असाधारण स्वरूप प्रकट केलं, ते कुमार मनाला भारून टाकणारं आहे. ज्ञानदेवांच्या जीवनातील एकेका लीळेनं कुमारांची मनं गहिवरून जातात अन् त्यांच्या वाणीतील एकेका ओवीनं त्यांना काही आगळ्या-वेगळ्या दिव्यतेचा वेध लागतो. वैयक्तिक दुःखांना समाजाच्या दुःखाच्या पातळीवर नेऊन, त्यांचा निरास करण्यासाठी सर्वस्वाचा होम करणारा हा कुमार वयाचा महात्मा कुमारांचा सखा-सांगाती न बनला तरच आश्चर्य !

माणसं इतरांशी वाईट वागतात ती अज्ञानामुळं; त्यांचं अज्ञान दूर केलं नाही, तर ती माणुसकीला मुकतील अन् सैतानी वृत्तीच्या स्वाधीन होतील; म्हणून आईच्या मायेनं तळमळणारा हा महा-पुरुष कुमारांच्या कोवळ्या भाववृत्तींना एका उदात्त दृष्टीचं देणं देतो अन् आपल्या रससुंदर कवितेनं त्यांची सौन्दर्यदृष्टीही तरल बनवितो. ज्ञानदेवांच्याच शब्दांत सांगायचं झालं, तर जीवनाच्या वाटेवर 'कारुण्यामाजी पाऊलें लपवीत' कसं चालावं अन्

' डोळियांच्या आंजुळींतून ' विश्वाच्या दैवी सौन्दर्याचं पान कसं करावं, हे ज्ञानदेव शिकवितात.

श्री. वाळिंबे यांनी ज्ञानदेवांच्या व्यक्तित्वाचे हे विशेष आपल्या रसाळ अन् वेधक शैलीनं टिपले आहेत त्यांची असाधारण जीवन-गाथा आपल्या प्रत्ययकारी शब्दांतून कुमारांच्या दृष्टीपुढे चलत्-चित्रपटासारखी उभी केली आहे. श्री. वाळिंबे हे आदर्शवादी वृत्तीचे लेखक आहेत. कुमारमने उदात्त भावनांनी, उत्कट ध्येय-वादाने अन् तरल सौन्दर्यासक्तीने भारून टाकण्याचे कसब त्यांच्या लेखणीत आहे. हे कसब वापरून त्यांनी लिहिलेल्या या लघु-चरित्राचे कुमारवाचक मनःपूर्वक स्वागत करतील, यात मला तरी संशय नाही.

१९ सप्टेंबर १९७५

**–रामचंद्र चिंतामण ढेरे**

# आम्ही चकोर, हरि चंद्रमा

पाहता पाहता सातशे वर्षे झाली. दिवस कसे कापरासारखे उडाले; पण अजून मागे सुगंध दरवळतोच आहे. उजळलेल्या कापरासारखाच मंद, स्निग्ध प्रकाश रेंगाळतो आहे. विसरू म्हटले तरी विसरता येत नाही. सारे कसे काल घडल्यासारखे वाटते. नुसता आठव आला, की उत्कंठा शतकांची पाऊलवाट लीलया तुडवू लागते. न दमता, न थकता, डोळ्यांपुढे पुण्यसलीला इंद्रायणीचे तीर्थजळ उसळ्या घेऊ लागते. सिद्धेश्वराच्या पुरातन देवालयातील सायंकालीन घंटांचे नाद-निनाद स्पष्टपणे ऐकू येऊ लागतात. जोडीला ब्रह्मवृंदांच्या घनगंभीर आवाजातील शिवस्तवनाचा मंत्रघोष. अलंकापुरीच्या वेशीबाहेर असलेल्या चंद्रमौळी झोपडीतला तो प्रसंग तर माझ्या डोळ्यांसमोर आता-या क्षणी स्वच्छ दिसतो आहे....

अशीच एक रात्र होती. कार्तिकी पौर्णिमा. इंद्रायणीच्या जललहरींवर त्रिपुरवातींच्या दीपमालिका संथपणे, शांतपणे तरंगत होत्या. उत्तर रात्रीच्या मंद वायुलहरी आसमंतात सुखद गारवा आणीत होत्या. कुठेतरी प्राजक्त फुलत होता. रातराणी दरवळत होती आणि अशा शांत

वेळी, त्या चंद्रमौळी झोपडीतून मंद-सुगंधी वायुलहरींवर आंदोळत येणारे त्या गीताचे सूर काना-मनांवर जणू अमृताचा शिडकावा करीत होते. प्रथम एक वृद्धसा, धीरगंभीर आवाज येई—'आम्ही चकोर, हरि चंद्रमा ऽ'

—अन् मग पाठोपाठ चार कोवळ्या मुलांच्या सुरेल आवाजात त्याच पंक्तींचा पुनरुच्चार...

'आम्ही चकोर, हरि चंद्रमा ऽ'

हा वृद्ध, धीरगंभीर, पुरुषी आवाज या घरच्या कर्त्या पुरुषाचा—विठ्ठलपंतांचा. आधी संन्यास घेऊन पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारण्याचा सामाजिक गुन्हा केलेल्या एका समाजबहिष्कृताचा. त्याच्या पाठोपाठ सुरेल आवाज घुमत होता त्याच्या संन्यासोत्तर कालात जन्माला आलेल्या चार कोवळ्या जीवांचा—निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ता या चार बछड्यांचा. साऱ्या समाजाने वाळीत टाकल्यावर त्यांना वाली राहिला होता, एक परमेश्वर. तो हरी. जगाचे पालन-पोषण करणारा स्नेहधवल चंद्रमा. त्याच्या चांदण्यातून पाझरणाऱ्या प्रेमामृतानेच आता त्यांची कोवळी जीवने बहरणार-मोहरणार होती. विठ्ठलपंतांनी ते जाणले होते. आपल्या अक्षम्य अपराधामुळे आपल्या अपत्यांना वनवास भोगावा लागतो, या जाणिवेनें त्यांच्या हृदयात कालवाकालव होई. मग ते कमालीचे हळवे बनत. आर्त, आर्द्र स्वरात जगन्नियंत्या परमेश्वराला साद घालीत. म्हणत,

...आम्ही चकोर हरि चंद्रमाऽ
आम्ही कळा, तो पौर्णिमा
आम्ही देही, तो आत्मा
आम्ही विदेही, तो परमात्मा

... खरेच. विठ्ठलपंत विदेही होते, विरक्त होते, संन्याशी होते; पण त्यांना हे ठाऊक नव्हते, की ते ज्या परमात्म्याला आर्त भावाने साद घालीत होते, तो परमात्मा प्रत्यक्ष त्यांच्या कुशीतच येऊन विसावला होता आणि स्वतःच्या नाभिस्थानी असणाऱ्या कस्तुरीच्या धुंदगंधाने वेडावून गेलेल्या कस्तुरीमृगासारखे विठ्ठलपंत वेडावून गेले होते. आपल्या सदा सन्निध असणाऱ्या 'हरी' चे त्यांना भान उरले नव्हते. त्यांच्या पोटी साक्षात् भगवान श्रीकृष्ण अवतरले होते—छोटया ज्ञानदेवाच्या सगुण-साकार रूपाने वावरत होते आणि बिचाऱ्या विठ्ठलपंतांना त्याचा पत्ताच नव्हता ! हे असे कसे झाले असेल ? सांगतोच ती सगळी कथा !

□ □ □

## पवित्र ते कुळ :

पैठणच्या पूर्वेला चार कोसांवर, गोदावरीच्या तीरी एक गाव आहे. त्याचे नाव आपेगाव. गोविंदपंत कुलकर्णी

वेळी, त्या चंद्रमौळी झोपडीतून मंद–सुगंधी वायुलहरींवर आंदोळत येणारे त्या गीताचे सूर काना-मनांवर जणू अमृताचा शिडकावा करीत होते. प्रथम एक वृद्धसा, धीरगंभीर आवाज येई—'आम्ही चकोर, हरि चंद्रमा ऽ'

—अन् मग पाठोपाठ चार कोवळ्या मुलांच्या सुरेल आवाजात त्याच पंक्तींचा पुनरुच्चार...

'आम्ही चकोर, हरि चंद्रमा ऽ'

हा वृद्ध, धीरगंभीर, पुरुषी आवाज या घरच्या कर्त्या पुरुषाचा—विठ्ठलपंतांचा. आधी संन्यास घेऊन पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारण्याचा सामाजिक गुन्हा केलेल्या एका समाजबहिष्कृताचा. त्याच्या पाठोपाठ सुरेल आवाज घुमत होता त्याच्या संन्यासोत्तर कालात जन्माला आलेल्या चार कोवळ्या जीवांचा—निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ता या चार बछड्यांचा. साऱ्या समाजाने वाळीत टाकल्यावर त्यांना वाली राहिला होता, एक परमेश्वर. तो हरी. जगाचे पालन–पोषण करणारा स्नेहधवल चंद्रमा. त्याच्या चांदण्यातून पाझरणाऱ्या प्रेमामृतानेच आता त्यांची कोवळी जीवने बहरणार-मोहरणार होती. विठ्ठलपंतांनी ते जाणले होते. आपल्या अक्षम्य अपराधामुळे आपल्या अपत्यांना वनवास भोगावा लागतो, या जाणिवेनें त्यांच्या हृदयात कालवाकालव होई. मग ते कमालीचे हळवे बनत. आर्त, आर्द्र स्वरात जगन्नियंत्या परमेश्वराला साद घालीत. म्हणत,

...आम्ही चकोर हरि चंद्रमाऽ
आम्ही कळा, तो पौर्णिमा
आम्ही देही, तो आत्मा
आम्ही विदेही, तो परमात्मा

... खरेच. विठ्ठलपंत विदेही होते, विरक्त होते, संन्याशी होते; पण त्यांना हे ठाऊक नव्हते, की ते ज्या परमात्म्याला आर्त भावाने साद घालीत होते, तो परमात्मा प्रत्यक्ष त्यांच्या कुशीतच येऊन विसावला होता आणि स्वतःच्या नाभिस्थानी असणाऱ्या कस्तुरीच्या धुंदगंधाने वेडावून गेलेल्या कस्तुरीमृगासारखे विठ्ठलपंत वेडावून गेले होते. आपल्या सदा सन्निध असणाऱ्या 'हरी' चे त्यांना भान उरले नव्हते. त्यांच्या पोटी साक्षात् भगवान श्रीकृष्ण अवतरले होते—छोट्या ज्ञानदेवाच्या सगुण-साकार रूपाने वावरत होते आणि बिचाऱ्या विठ्ठलपंतांना त्याचा पत्ताच नव्हता ! हे असे कसे झाले असेल ? सांगतोच ती सगळी कथा !

□ □ □

## पवित्र ते कुळ :

पैठणच्या पूर्वेला चार कोसांवर, गोदावरीच्या तीरी एक गाव आहे. त्याचे नाव आपेगाव. गोविंदपंत कुलकर्णी

हे तिथले एक सज्जन अन् विद्वान गृहस्थ. नीराबाई ही त्यांची पत्नी. नंदादीपासारखी त्यांची शांत आणि स्नेहशील जीवने. स्वतः जळून दुसऱ्यांना प्रकाश देणारी, दुसऱ्यांच्या सुखाने हसणारी अन् दुःखानें रडणारी. 'दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्यें पाहो। जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात ।' अशा वृत्तीने वागणारे हे दांपत्य. खरे तर त्यांना कसलेही दुःख असायला नको होते. पण तसे नव्हते. गोविंदपंतांच्या वयाची विशी ओलांडली गेली, तरी त्यांना अजून मूलबाळ काही झाले नव्हते. आजच्या हिशेबाने हे वय फार नव्हते. परंतु तो जुना काळ. विवाह लवकर होत. स्वाभाविकच मुलेही लौकर--निदान वेळेवर व्हावी, ही अपेक्षा असायची.

गोविंदपंतांचे असेच झाले. लग्न होऊन दहा वर्षे झाली; पण अजून पितृत्व काही लाभले नाही. गोविंदपंत तसे विचारी, विवेकी. एवढ्या तेवढ्याने हलून जाण्याचे, दुःखी होण्याचे त्यांच्या स्वभावात नव्हते. पण नीराबाई ! त्यांना एवढा संयम झेपत नसे. दुपारच्या शांत वेळी तुळशीवृंदावनाच्या कट्ट्यावर बसल्या असताना त्यांचे डोळे भरून येत. डोक्यात नाना प्रकारचे विचार गर्दी करीत. वाटे,

कोरांटीच्या अन् नेप्ती-बोराटीच्या झाडाला देखील फुले येतात, त्या झाडांहून सुद्धा मी अभागी असावे का ?

एखाद्या काळ्या करंद, अवजड पाषाणातून देवाची सुंदर सुरेख मूर्ती जन्म घेते, त्या दगडाइतकीही माझी योग्यता नाही का? गोठ्यातल्या गाईंनी आपल्या वासरांना मायेने हुंगायला अन् चाटायला सुरुवात केली, की त्यांच्या मनात एक अनामिक हुरहुर दाटून येई, हृदयात बारीकशी कळ उठे. हे सुख आपल्याला कधीच मिळणार नाही का, या विचाराने त्या सैरभैर होत अन् मग रात्री पतीच्या उशाशी पाण्याचा तांब्या ठेवताना ते नकळत पुटपुटत,

'हे असं किती दिवस चालायचं हो?'

गोविंदपंत नीराबाईंच्या वेदनेवर हळुवार शब्दांनी फुंकर घालीत.

'असं होणार नाही! तो जगन्नियंता, परमदयाघन परमात्मा आपल्याला अधिक काळ असं दुःखी ठेवणार नाही. थोडा धीर धरा. त्याच्यावर विश्वास ठेवा. सगळं काही तुमच्या मनासारखं होईल.'

नीराबाई या आश्वासक शब्दांनी सुखावत. त्या परमदयाळू परमेश्वराची कृपादृष्टी आपल्याकडे कधी वळते याची वाट पाहत.

– पण मग त्यांना फार काळ वाट पाहावी लागलीच नाही. एका प्रातःकाळी आकाशातल्या लालबुंद सूर्यबिंबाला वंदन करीत असतानाच त्यांच्या ध्यानी आले, दयाघन प्रभूने आपली हाक ऐकली आहे. लवकरच आपण

आई होणार आहोत. त्या कल्पनेसरशी त्यांनी डोळे मिटले, मस्तक झुकवले आणि किणकिणत्या कंकणनादात त्यांच्या मुखातून शब्द उमटले,

'प्रभो, तुझी मी ऋणी आहे!'

卐 卐

वयाच्या पंचविसाव्या वर्षी गोविंदपंतांना पुत्र झाला. बाळाचं नाव ठेवलं, विठ्ठल.

सूर्यनारायणाच्या कृपाप्रसादाने जन्माला आलेला हा मुलगा सूर्यासारखाच तेजस्वी होता. सूर्यबिंबासारखाच तो क्रमाक्रमाने प्रकाशमान् होऊ लागला. विनम्र वृत्ती, देवा-धर्माविषयी नितांत श्रद्धाभाव, ज्येष्ठांविषयी आदर, कनिष्ठांबद्दल कमालीची कोवळीक, कुशाग्र बुद्धी, विद्यार्जनाविषयी तीव्र तळमळ—किती म्हणून गुण सांगावे? विठ्ठल नुसता सद्‌गुणी होता एवढे म्हणून भागलेच नसते. तो सद्‌गुणांचा सागर होता. अथांग, धीमा नि शांत.

सातव्या वर्षी त्याची मुंज झाली. अल्पकाळातच त्याने वेदशास्त्रांचे अध्ययनही पूर्ण केले आणि मग एके दिवशी तो वडिलांना वंदन करून म्हणाला,

'पिताजी, एक विचारू का?'

'अवश्य! काय म्हणतोस?'

'माझे अध्ययन पूर्ण झाले. आता मला तीर्थाटन करायची इच्छा आहे. आपली आज्ञा असावी.'

गोविंदपंत क्षणभर विचारात पडले. नीराबाईही सचिंत झाल्या. इतक्या नवसासायासाने लाभलेला हा मुलगा एकाएकी तीर्थाटनाला जाऊ का, असं विचारतो अन् त्याचे वडीलही पटकन 'जा' म्हणून सांगतात की काय, या विचाराने त्या एकदम बावरल्या, घाबरल्या.

विठ्ठल समोर विनम्र होऊन उभा होता. गोविंदपंत विचार करीत होते.—हा पोरगा नवसानं लाभलेला; आपल्याला हवाहवासा, पण मोठा निग्रही. आपण पाहतो आहोत, तसा वैराग्य-विचारांनी वेडावलेला. संसारापेक्षा संन्यास याला जवळचा वाटत असावा. घरापेक्षा मठ आवडत असावा; एरवी ज्या वयात घर-प्रपंच करायची इच्छा असायची, त्या वयात तीर्थाटनाला जाण्याचे विचार याच्या मनात का आले असते? याला 'जाऊ नको' म्हणावे का? पण त्याने नाही ऐकले तर! —'

या विचाराशी ते ठेचाळले. चमकून त्यांनी मुलाकडे पाहिले. मग खाली नजर वळवून मनातल्या मनात म्हणाले,

'छे! भलतीच शंका घेणे बरोबर नाही. हा मुलगा नम्र आहे, आज्ञाधारक आहे. तो आपली अवज्ञा करणार नाही, हे खरे. पण म्हणूनच आपण त्याच्या संकल्पाला अडथळा आणू नये, हे बरे!'

मग ते विठ्ठलकडे वळून म्हणाले,

'छान ! चांगला आहे तुझा विचार. अवश्य जा तू तीर्थाटणाला.'

वडिलांच्या अनुज्ञेमुळे विठ्ठलाचा आनंद गगनात मावेना. नीराबाई मात्र हतबुद्ध झाल्या. काहीशा कष्टी झाल्या. बोलल्या काहीच नाहीत; फक्त त्यांनी पदराने डोळे टिपले.

गोविंदपंत समजावणीच्या सुरात त्यांना म्हणाले,

'असे डोळे भरून येऊ देऊ नका. हसा पाहू. त्याच्या सुखात आपले सुख. देवदर्शनात, तीर्थस्नानात त्याला प्रसन्न-पवित्र वाटते; तर त्याची प्रसन्नता कशाला हिरावून घ्यायची ? माझं ऐका. जाऊ द्या त्याला. प्रसन्न मनाने, हसतमुखाने त्याला आशीर्वाद द्या. 'शुभास्ते सन्तु पन्थानः !'

–आणि नीराबाईंनी पतीची आज्ञा ऐकली. डोळे पुसले. बळेबळेच हसरा चेहरा करीत त्यांनी विठ्ठलला आशीर्वाद दिला. नमस्कार करण्यासाठी तो खाली वाकला, तेव्हा त्या भरल्या डोळ्याने म्हणाल्या,

'एक लक्षात ठेव मात्र. आम्ही दोघं तुझी आईबापे तू परत येण्याची वाट पाहतो आहोत. जा, सुखी राहा.'

पुढे त्यांना बोलवेना.

आपल्या माता-पितरांची ती दुःखी अवस्था विठ्ठलने जाणली. तोही रुद्ध कंठाने पुटपुटला,

'मी तुम्हाला विसरणार नाही. लौकरच मी परतेन.'

—असं म्हणून त्याने उंबरठा ओलांडला—तीर्थयात्रेचे प्रस्थान ठेवले.

□ □ □

# पावन तो देश

दिवस उजाडत होते. मावळत होते. गावामागे गावे मागे पडत होती. उन्हाळा—पावसाळा हिवाळा ... ऋतुचक्र फिरत होते. विठ्ठलपंत वाट चालतच होते. काशी झाली, मथुरा झाली, द्वारका, पिंडारक, सुदामपुरी, मूळमाधव, भालुकातीर्थ, प्रभासपट्टण, त्र्यंबकेश्वर, मुचकुंद गुंफा, सप्तशृंगी, भीमाशंकर—कितीतरी ठिकाणे.

गावात पोचलाच एखाद्या धर्मशाळेत, मठात नाही तर एखाद्या सज्जन सत्प्रवृत्त गृहस्थाकडे जाऊन पडशी टाकावी; नदी—निर्झर—आड—विहीर काय असेल तिथे जाऊन सुस्नात व्हावे; मग देवालयात जाऊन देवदर्शनाचा आनंद निवान्त, मनमुराद उपभोगावा; काही पोथी-पारायण करावे; स्तोत्रे-आरत्या म्हणाव्या; कोणी शास्त्री-पंडीत भेटला तर वेदवेदांगाविषयी, अध्यात्माविषयी बोलावे आणि सावकाश मुक्कामावर परतावे. पोटपूजा करावी आणि पुढचा मार्ग धरावा. कधी या गोष्टींचा क्रम

थोडा मागेपुढे होई. नाही असे नाही; पण एकूण कार्यक्रम हाच—असाच. तीर्थस्नानाने देहशुद्धी होत होती अन् देव-दर्शनाने, परमार्थचिंतनाने आत्मशुद्धी.




महिनोन् महिने ही अशी पदयात्रा-तीर्थयात्रा चालली होती. येता येता विठ्ठलपंत आळंदीस आले. महान् शिवपीठ आळंदी. सिद्धेश्वराचे पवित्र अन् जागृत स्थान. विठ्ठल-पंतांनी देवदर्शन घेतले. मग सिद्धेश्वरासमोरच बैठक

मारली. अंगाला भस्म लावले. गळ्यातील रुद्राक्षमणी-माला एकदा सारखी केली. डोळे मिटले अन् मग धीर-गंभीर स्वरात रुद्र म्हणायला सुरुवात केली.

असा किती वेळ गेला कुणास ठाऊक; पण विठ्ठल-पंतांनी रुद्र संपवून डोळे उघडले तेव्हा समोरच्या खांबाला टेकून उभे असलेले एक गृहस्थ त्यांनी पाहिले.

डोईवर नेटके पागोटे, अंगात बाराबंदी, त्यावर उपरणे, पायघोळ धोतर, कपाळी चंदनी गंध. डोळे विलक्षण बोलके, चेहरा हसरा. गृहस्थ लक्ष वेधून घ्यावा, असाच होता. पण आता त्याचेच लक्ष वेधून घेतले होते विठ्ठलपंतांनी.

विठ्लपंतांना मोठे आश्चर्य वाटले. त्यांनी न राहून मृदू स्वरात विचारले,

‘ काय हवंय आपल्याला ? का पाहता आहात असे एकटक ? ’

ते गृहस्थ भानावर आले. सावरून म्हणाले,

‘ माझं जरा चुकलंच. असं टक लावून पाहणं चांगलं नाही हे तर खरंच; पण तुम्ही इथं नवे दिसता. पाठांतरही चांगलं नि उच्चारही स्वच्छ·स्पष्ट आहेत. रूपगुण, विद्या·अशी एकत्र नांदताना पाहिली ... ’

‘ —म्हणजे बरं वाटतं. खरं ना ? माझंही असंच

आहे. मलाही बरं वाटतं, आदर वाटतो अशा माणसाविषयी.'

'अगदी खरं बोललात. मी इथला कुलकर्णी. सिधोपंत माझं नाव. छोटंसं चंद्रमौळी घर आहे. थोडी शेतीवाडी आहे. सुगृहिणी आणि सुकन्या यांनी घर भरलं आहे. जोडीला सिद्धेश्वराची कृपा आहे. सुखी संसाराला आणखी काय हवं? ...

विठ्ठलपंतानी ओळखलं, बुवा गोष्टीवेल्हाळ दिसतात. वाणी मिठठास आहे. पण यांच्या मनातला हेतू काही कळत नाही.

एवढ्यात सिधोपंत म्हणाले,

'एक विचारू का ?'

'विचारा नं. अनुज्ञा कशाला हवी ? आपण ज्येष्ठ आहात... '

'अगदी बरोबर. मग आता आपलं नाव-गाव तरी सांगा मला ?'

'मी विठ्ठल. पैठणजवळ आपेगाव आहे ना, तिथल्या गोविंदपंत कुलकर्ण्यांचा मुलगा. वेदाध्ययन झालं, आता तीर्थयात्रा करीत फिरतो आहे. इथून दक्षिणयात्रेला प्रस्थान ठेवणार.'

एका दमात एवढी माहिती सांगून विठ्ठलपंत थांबले. सिधोपंत हसून म्हणाले,

'अगदी मला हवी तेवढी माहिती सांगितलीत. आता असं करा. सूर्य माध्यान्ही आलाय. आपलं भोजन व्हायचं




असेल. मी इथं जवळच राहतो. मला आपल्या पंक्तीचा लाभ दिला तर फार बरं वाटेल.'

विठ्ठलपंत थोडे विचारात पडले. जावे न जावे असे वाटले. पण गृहस्थ भले होते. आपण यात्रेकरू. कुठेतरी दोन घास पोटात घालायचेच. हे म्हणताहेत, तर यांच्याकडे जाऊ.

विठ्ठलपंत उठले. सिधोपंतांना म्हणाले,

'ठीक आहे, चला.'

सिधोपंतांना आनंद वाटला. ते लगबगीने पुढे निघाले. मागोमाग विठ्ठलपंत चालू लागले.

卐 卐

भोजनोत्तर विठ्ठलपंत सिधोपंतांच्या ओटीवरच जरा लवंडले. निमिषार्धात त्यांचे डोळे मिटले. त्यांना झोप लागली. ते जागे झाले झाले तेव्हा उन्हं उतरणीला लागली होती. गडबडीने उठून विठ्ठलपंत म्हणाले,

'छे ! फार वेळ झाली झोप !'

'चालायचंच ! दमला-भागला जीव असतो. लागते झोप' सिधोपंत म्हणाले.

'बरं ! मी निघतो. आपली अनुज्ञा द्या.' विठ्ठलपंतांनी डोकीवर पगडी चढविली; पण तेवढ्यात सिधोपंत म्हणाले,

'आता कुठं जाणार ?'

'कुठल्या तरी धर्मशाळेत ?'

'धर्मशाळेत ? ते कशाला ? इथंच राहा की. आम्हांलाही सत्संग होईल. जागाही ऐसपैस आहे '

विठ्ठलपंत पुन्हा विचारात पडले. एकदा वाटले, या मोहात पडायला नको. आपण घर सोडले कशासाठी ? वैराग्याच्या ओढीने. आणि हे गृहस्थ तर सारखे प्रपंचाचे आख्यान लावून राहिलेले. आपल्याला इथे राहवून घेण्यात यांचा काय उद्देश असेल ? एकदा वाटे, काही का उद्देश असेना, अजून आपण काही संन्यास घेतला नाही. कुठेतरी राहायचे ते इथे राहू. फार मोहात गुंतले नाही म्हणजे झाले.

हो-नाही करता करता विठ्ठलपंतांनी सिधोपंतांना रुकार दिला. त्यांच्याच घरी ते राहिले. सिधोपंतांच्या अल्लड मुलीने–रखुमाईने हळूहळू या नव्या पाव्हण्याशी गट्टी केली. विठ्ठलपंत खरे विरागी; पण त्या लाघवी मुलीने पाहता पाहता त्यांना लळा लावला. सिधोपंतांनी मग एक दिवस सरळच विषयाला हात घातला. ते विठ्ठलपंतांना म्हणाले,

'हूंऽ मग काय पंत, कशी काय वाटली माझी मुलगी ?'

'-मोठी लाघवी आहे पोर.'

'नुसती लाघवीच काय घेऊन बसलात, हुशारसुद्धा आहे. स्वैपाकपाणी, शिवणं-टिपणं, थोडं पाठांतर, घरकाम

सगळ्यात प्रवीण. तुम्हाला तिचा स्वभावही आवडलासा वाटतो. पाहा, तिला पदरात घेतलं तर मला धन्यता वाटेल.'

सिधोपंत एवढं बोलले आणि क्षणभर थांबले. आपल्या बोलण्याचा विठ्ठलपंतांच्या मुद्रेवर काय परिणाम होतो हे पाहू लागले.

विठ्ठलपंत पुरते गोंधळले होते. हे असे काही होणार, अशी भीती त्यांना आरंभापासून वाटत होतीच, आता ती खरी ठरली होती. हा कसोटीचा क्षण होता. प्रपंचाची त्यांना ओढ नव्हती, पण रखुमाईने त्यांना मोह पाडला होता. संसार करायचाच ठरला तर हिच्यासारखी गुणी पत्नी शोधूनही सापडली नसती !

विठ्ठलपंत बोलत नाहीसे पाहून सिधोपंतच पुन्हा म्हणाले.

'तुमच्या मनातलं द्वंद्व ओळखतो मी पंत. संसार की संन्यास, प्रपंच की परमार्थ, अशा कात्रीत सापडला आहात तुम्ही; पण एक लक्षात ठेवा पंत, गृहस्थाश्रम हा सर्व आश्रमांत श्रेष्ठ मानला आहे शास्त्रकर्त्यांनी. शिवाय आपल्या धर्माने जे चार आश्रम सांगितले आहेत त्यात ही गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम असाच क्रम आहे. तुम्हाला संन्यासच घ्यायचा असला, तर तोही घेण्याची धर्माने सोय केली आहे. आणि परमार्थाचं म्हणाल, तर प्रपंचात राहूनही परमार्थ साधता येतोच की. खरंच

माझं ऐका पंत तुम्ही. माझी रखुमाई तुम्हाला चांगली साथसंगत करील . . .'

विठ्ठलपंतांच्या मनात विचारांचे एक प्रचंड मोहोळ उठवून सिधोपंत आपल्या उद्योगाला निघून गेले. विचार करता करता विठ्ठलपंतांचे मस्तक शिणून गेले. झोपेतही तेच विचार त्यांच्या मनात गुंजत राहिले. अखेर त्यांच्या स्वतःच्या वैराग्यपर विचारांवर सिधोपंताच्या प्रपंचवादी विचारांनी मात केली. विठ्ठलपंत सिधोपंताच्या रखुमाईशी विवाहबद्ध व्हायला तयार झाले.

--आणि तोच क्षण विलक्षण क्रांतिकारक ठरला. प्रत्यक्ष विठ्ठलपंतांच्या आणि महाराष्ट्राच्या जीवनातही.

□ □ □

# जेथ हरीचे दास । जन्म घेती ॥

विठ्ठलपंत-रखुमाई यांचा संसार सुरू झाला. सिधोपंतांनी म्हटल्याप्रमाणे रखुमाई सर्वभावे पतिजीवनाशी समरस झाली. पण विठ्ठलपंत ? त्यांना काही आपल्या पत्नीच्या भावजीवनाशी तन्मय होता येईना. काही केल्या त्यांचे मन संसारात रमेना. ते सदैव अस्वस्थ होऊ लागले. आपण हा लग्नाचा खोडा पायात अडकवून घेतला, ही

मोठीच घोडचूक केली असे त्यांना राहून राहून वाटू लागले. मनःशांतीसाठी ते तासन् तास सिद्धेश्वराच्या देवळात जाऊन ध्यानधारणा करू लागले. नित्य धार्मिक अन् वेदान्तपर ग्रंथ वाचण्याचा त्यांनी परिपाठ ठेवला. रात्र रात्र जागून देवाची आळवणी आरंभली. पण चित्ताला स्वस्थता कशी ती लाभेना. मुळात त्यांचा पिंडच विरक्त माणसाचा. एका असावध क्षणी सिधोपंतांच्या आग्रहाला आणि रखुमाईच्या मोहक सहवासाला भुलून ते या लग्नाच्या जोखडात अडकले; परंतु आता त्यांना त्याचा पश्चात्ताप होऊ लागला. त्यांना अन्न गोड लागेना. झोप येईना. कशात म्हणून त्यांना शांतता मिळेना. शेवटी एक दिवस ते उठले आणि आपल्या सासऱ्यांच्या–सिधोपंतांच्या पुढे येऊन उभ राहिले. नम्र पण अस्वस्थ होऊन. जावई एकाएकी समोर उभे पाहून सिधोपंत गडबडले. ते काही विचारणार तोच विठ्ठलपंत म्हणाले,

'मी जरा यात्रेला जाऊन येतो.'

'वाः ! नामी कल्पना ! आम्हीसुद्धा येऊ. चला ! कधी निघायचं ?' सिधोपंत टाळी वाजवून अन् हर्षभरित होऊन म्हणाले. त्यांचा हा उत्साह पाहून विठ्ठलपंत मात्र फारच संकोचले. ते तुटक स्वरात म्हणाले,

'सध्या मी एकटाच जातो. माझे अपूर्ण राहिलेले यात्राचक्र पुरे करून येतो. . .'

'असं म्हणता ? ठीक आहे !' सिधोपंतांचा स्वर कोमेजला.

दुसऱ्या दिवशी विठ्ठलपंतांनी आपली पडशी उचलून आळंदीची वेस ओलांडली. पुन्हा मागच्यासारखीच भ्रमंती सुरू झाली. आता त्यांना दक्षिणयात्रा करायची होती. कृष्णा, कावेरी, तुंगभद्रा या नद्यांच्या तीर्थजळात काया पुनीत करायची होती.

श्रीशैल, व्यंकटगिरी, रामेश्वर, शिवकांची, गोकर्ण, करवीर, कऱ्हाड, माहुली–यात्रा संपली. मन पुष्कळसे शांत झाले. मग पुढे उभी राहिली रखुमाई. त्यांची धर्मपत्नी. वाटले, आपण लग्न केले ही चूक खरी; पण ती आपली. रखुमाईचा त्यात काय अपराध ? तिला एकटीला सोडून आपण असे यात्रापर्यटणाला बाहेर पडलो हे काही बरे केले नाही. राम वनवासाला गेला तरी त्याने पत्नीला बरोबर नेले आणि आपण ? यात्रेला प्रस्थान ठेवताना साध्या एका शब्दानेही तिला विचारले नाही. काय वाटले असेल तिला ? त्यांच्या मनात अपराधीपणाची भावना तीव्र झाली. नकळत पावले घराकडे वळली.

रखुमाई तुळशीपुढे रांगोळी घालीत होती. सकाळ मोठी सुंदर होती. हसरी. सोनेरी. एक प्रकारच्या उल्हासाने बागडणारी. रखुमाईच्या मनात एक अबोल अबोध हुरहुर

दाटून राहिली होती. रांगोळी घालताना ती हुरहुर शब्द-रूपाने प्रकट पाहात होती. एवढ्यात-

तुळशी वृंदावनाजवळ दोन दणकट पुरुषी पावल तिने पाहिली. ती दचकली. पापण्या किंचित उंचावून तिने थोडके वर पाहिले. आणि ती पाहातच राहिली. समोर विठ्ठलपंत उभे होते. प्रवासाने श्रान्तक्लान्त झालेले, तरीही हसतमुख. त्यांना पाहून रखुमाई एकदम लाजली-संकोचली. उत्कंठा, आनंद, हर्ष सगळ्या भावना एकात एक मिसळून गेल्या. सतारीच्या तारांना नकळत हस्तपर्श व्हावा अन् मग त्याचा कंप आणि झंकार शरीराच्या साऱ्या अणुरेणूत थरथरत-झंकारत राहावा तसे काही तरी झाले. ती मग तिथे थांबलीच नाही. लगबगीने आत पळाली. सामोरे आले सिधोपंत. त्यांनी जावयाला हाताला धरून आत नेले. कुशल विचारले. त्यांचा श्रमपरिहार केला.

असेच आणखी काही दिवस गेले आणि मग विठ्ठल-पंत आपल्या पत्नीला, सासु-सासऱ्यांना घेऊन आपल्या आईवडिलांकडे-आपेगावी परतले.

बारा वर्षांनी मुलगा परत आला. गोविंदपंत आणि नीराबाई यांचा आनंद काय वर्णावा ? शिवाय मुलगा आला तो लग्न करून. आपल्याला एक सुलक्षणी-गोजिर-वाणी सून घेऊन. वाटत होते, हा मुलगा संन्यासीच

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.

होणार ! पण नाही. भगवंताला काळजी होती. हा आनंद ओठीपोटी बागवीत गोविंदपंत-नीराबाई आपल्या मावळत्या जीवनाची वाटचाल करीत राहिले.

—आणि मग एक दिवस त्या दोघांनीही आपल्या पुत्राच्या मांडीवर मान ठेवून इहलोकीचा निरोप घेतला. विठ्ठलपंतांच्या जीवनातले एक पर्व समाप्त झाले. थोड्याच दिवसांनी सासू-सासरेही आळंदीला परतले. मागे उरले विठ्ठलपंत आणि रखुमाई.

पुन्हा प्रपंचाची जबाबदारी शिरावर आली. तशीच वैराग्याचीही ओढ वाढू लागली. पुन्हा ती जीवघेणी अस्वस्थता. डोके शिणवणारी संत्रस्तता. स्वतःच्या अपराधाची तीव्र जाणीव. पश्चात्तापाच्या डागण्या. झोप गेली. अन्नावरची वासना उडाली. मस्तकात विचारांचे काहूर उठले.

—अन् पतीची ही सैरभैर, उद्ध्वस्तमनस्क अवस्था पाहून रखुमाई हादरली. त्या शहाण्या पोरीने पतीला नाना प्रकारे समजावण्याचा, शांत करण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु गुण येईना. मग तिने सरळ आपल्या आई-वडिलांकडे धाव घेतली. रखुमाईचा निरोप पोचताच ती दोघे पावसाळ्यातल्या ओढ्यासारखी धावून आली. त्यांनी विठ्ठलपंतांचा रागरंग ओळखला आणि या अवस्थेत या दोघांना एकटे राहू देण्यात अर्थ नाही, असे जाणून ते

विठ्ठलपंत आणि रखुमाई या दोघांना घेऊन आळंदीला परतले.

गाव बदलले, वातावरण बदलले, आपण वडिलधारेपणाने लक्ष ठेवले आणि पत्नीने रमविले, तर विठ्ठलपंत वैराग्याचे वेड झटकून टाकतील; संसारात रंगून जातील, अशी त्या भाबड्या जीवांची कल्पना. परंतु विठ्ठलपंतांचे हे वैराग्य वरवरचे आणि केवळ परिस्थितीतून उद्भवलेले असे क्षणिक नव्हते. ते अंतस्तलातून उफाळले होते. त्यांनी एक दिवस आपली अस्वस्थता रखुमाईच्या कानी घातली आणि म्हटले,

' खरं सांगू, माझे मन संसारात रमणार नाही. मला संन्यास घेऊ दे. तुझी संमती दे. '

आपल्या पतीचे ते अत्यंत कळवळून उच्चारलेले शब्द ऐकून रखुमाईच्या डोळ्यापुढे अंधारी आली. तिला काही सुचेना. त्या जगावेगळ्या आवाहनाला प्रतिसाद देववेना. ती अगदी जडमूढ बनून गेली. विठ्ठलपंतांच्या संन्यासाला अनुमती देणे म्हणजे आपल्या हाताने आपल्या संसाराची चार चूलबोळकी फोडून टाकणे, उजाड होणे, उद्ध्वस्त होणे. पण मग यावर उपाय काय ?

देवाला सांकडे घालणे. व्रतवैकल्ये करणे. उपासाने काया चंदनासारखी झिजविणे. देव मग तरी देईल ना त्यांना संसारी जीवनात रस घेण्याची बुद्धी !


V R SALI

रखुमाईने तेच केले. त्या व्रतोपवासाने ती कृश झाली. एके दिवशी ती अर्धनिद्रावस्थेत असतानाच विठ्ठलपंतांनी तिला संन्यास घ्यायला अनुमती मागितली. आणि ग्लानी आल्यामुळे श्रान्त-क्लान्त झालेल्या रखुमाईच्या मुखातून नकळत होकारार्थी हुंकार बाहेर पडला.

विठ्ठलपंतांनी ती पडत्या फळाची आज्ञा मानली आणि लगोलग घर सोडून थेट काशी गाठली-

गंगेच्या तीरावर रामानंद यतींची एक मठी होती. विठ्ठलपंतांनी त्यांच्याकडे धाव घेतली. 'आपल्याला संन्यास द्यावा' अशी त्यांना विनंती केली. रामानंदांनी पाहिले, माणूस अधिकारी असावा. अध्यात्माची ओढ स्वाभाविक दिसते. विरक्ती मूळचीच वाटते. तरी त्यांनी प्रश्न केलाच-

'संन्यास हवा म्हणतोस? पत्नीची संमती आहे ना?'

क्षणमात्र विठ्ठलपंतांची चलबिचल झाली; पण ती मुखावर दिसू न देता ते ताठर-कणखर स्वरात म्हणाले,

'माझे लग्नच झालेच नाही; मग पत्नीची संमती कुठुन आणू?'

स्वामी हसले. ठीक म्हणाले.

दुसऱ्याच दिवशी त्यांनी विठ्ठलपंतांना विधिपूर्वक संन्यासदीक्षा दिली. त्यांचे नाव चैतन्याश्रम ठेवले.

卐 卐

पंतांच्या या संन्यासदीक्षेची वार्ता कर्णोपकर्णी होत होत आळंदीला येऊन पोचली. ती वार्ता ऐकून रखुमाई उदास हसली. तिच्या दुःखाला विश्व थिटे झाले. ती मनाशीच म्हणाली, ' देवानेच भक्ताला नास्तिक ठरवावे, सिद्धीनेच तपाला विटावे, अशी झाली माझी परवड.'

त्या दिवसापासून रखुमाईने हास्य टाकले. उपास अधिक कडकडीत केले. सर्व दिवस परमेश्वराच्या पूजन-चिंतनात, पोथ्या-पुराणांच्या वाचनात आणि अतिथि-अभ्यागतांच्या सेवा-स्वागतात ती व्यतीत करू लागली.

या गोष्टीला बारा वर्षे उलटून गेली.

एके दिवशी ती पिंपळाला प्रदक्षिणा घालीत होती. कुणीतरी म्हणाले,

' ऐकलंत का रखुमाई, समोरच्या मारुतीच्या देव-ळात कोणी स्वामी आलेत म्हणे !'

' अगबाई खरंच ! मग दर्शनाला जायलाच हवं !'

—आणि रखुमाई स्वामींच्या दर्शनाला आली. खाली वाकून तिने नमस्कार केला. 'पुत्रवती भव !' स्वामींनी आशीर्वाद उच्चारला. रखुमाईला हसू आले. स्वामी गंभीर झाले. त्यांनी रखुमाईला हसण्याचे कारण विचारले. त्यावर रखुमाईने आपली सारी हकीगत सांगितली. ती ऐकून स्वामी दचकले. आपण ज्याला नुकतीच संन्यासदीक्षा




दिली, तो चैतन्याश्रमच या बाईचा पती असला पाहिजे, हे त्यांनी तत्काळ जाणले. एका निष्पाप आणि सुशील पतिव्रतेच्या संसारसुखात व्यत्यय आणण्याचे पाप न कळत का होईना आपल्या हातून झाले, याची त्यांना खंत वाटली.

ते तसेंच माघारी फिरले. काशीला पोचताच त्यांनी खोटे बोलून आपल्याकडून संन्यासदीक्षा घेतल्याबद्दल चैतन्याची कानउघाडणी केली व त्याला पुनश्च संसारात पदार्पण करण्यास सांगितले.

बिचारे विठ्ठलपंत ! ते करायला गेले एक अन् हे झाले भलतेच ! पण आता गुर्वाज्ञा डावलणे अशक्य होते. ते निमूटपणे 'आलिया भोगासी' सादर झाले. पुन्हा संसाराची मांडामांड करणे आले. घर-प्रपंचाची जुळणी करणे आले. आपल्या जगावेगळ्या वैराग्याच्या ओढीमुळे पत्नीच्या मनाची कळी कोमेजली होती, ती पुन्हा फुलवणे, खुलवणे आले. विठ्ठलपंतांनी हे सारे पत्करले. स्वतःच्या मनाला काहीशी मुरड घालूनही पत्करले.

–पण हा जगावेगळा व्यवहार होता. धार्मिक दृष्टचा घोर अपराध होता. समाजाचे नियमन करणाऱ्या शास्त्री-पंडितांचा उपमर्द होता. या घटनेने कर्मठ ब्राह्मणांचे पित्त खवळले. त्यांनी विठ्ठलपंतांचा आणि रखुमाबाईंचा नाना प्रकारांनी छळ मांडला. त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार पुकारला. त्यांना गावातून हुसकावून लावले; अंत्यजा-सारखे गावाबाहेर एका चंद्रमौळी झोपडीत जाऊन राहणे भाग पाडले.

विठ्ठलपंतांनी हे सारे सोहाळे मुकाटचाने सहन

केले. 'ब्र' देखील उच्चारला नाही. ब्राह्मण भूदेव! त्यांना दोष कसा द्यायचा ?

卐 卐

अशी काही वर्षे गेली. भूमी पुरेशी तापली. चांगली खरपूस भाजली गेली. उलू लागली. संकटांचा झंझावात सुटला. विजा कडकडाव्यात, तसे शास्त्री-पंडितांच्या मुखातून अपशब्दांचे अन् शिव्याशापांचे आसूड कडकडू लागले. विठ्ठल-रखुमाई यांना जिणे नकोसे झाले; पण याच वेळी एक शुभशकुन घडला.

रखुमाईची अन्नावरची वासना उडाली. तिला डोहाळे लागले. धरती खूप तापली-भाजली, वारे सुसाट वाहू लागले, विजा कडकडू लागल्या—म्हणजे पाऊस येतो. विठ्ठलरखुमाईंच्या जीवनात सुखद पाऊस आता येणार होता. परमेश्वराचा कृपाघन त्यांच्यावर 'बोळणार असल्याची प्रसादचिन्हे दिसू लागली होती.

विठ्ठलपंत वनवासी होते. पत्नीचे डोहाळे पुरविण्याएवढे श्रीमंत नव्हते. त्यांच्या जवळ होती केवळ विरक्ती. 'मुक्ती'च्या स्वागतासाठी लागणारी 'निवृत्ती'. त्या 'निवृत्ती'तून त्यांना परमेश्वरी सामर्थ्याचे 'ज्ञान" झाले होते. त्या 'ज्ञाना'कडे जाण्याचा 'सोपान' मार्गही गवसला होता.

विठ्ठलपंतांच्या मनोभूमीत रुजलेल्या आणि रखुमाईने आपल्या भावसामर्थ्याने जपल्या-जोपासलेल्या या निवृत्ती, ज्ञान, सोपान आणि मुक्ती नामक कल्पनाच या दांपत्याच्या पोटी अपत्यरूपाने प्रकटल्या.

शके ११९५ च्या माघात जन्मला निवृत्ती. त्याच्या पाठोपाठ जणू धावत यावा तसा ज्ञानदेव आला. त्याच्या जन्मकाळाचे काय वर्णन करू ?

श्रावणाचा महिना. ऊनपावसाने हसणारा. त्यात वद्य अष्टमीची रात्र. कृष्णाष्टमीच ती. काळोखाचे काजळच नव्हे, तर काळोखाची उटी ल्यालेली. आकाशात ढगांची दाटी झालेली. जोडीला मुसळधार पाऊस. मधूनच विजांचा लखलखाट. एका प्रकाशपुरुषाच्या आगमनाचे शुभसूचन घडविण्यापुरता. वाऱ्याचे तांडवनृत्य चाललेले. ढगांची धिंगामस्ती रंगात आलेली.

विठ्ठलपंतांच्या झोपडीचे छप्पर गळत होते. मधूनच वाऱ्याच्या बळाने वर उचलले जात होते. झोपडीतली एकुलती एक समई मघाच विझली होती. तिला ठाऊक होते, क्षणभराने इथे एक ज्ञानसूर्य प्रकाशमान होणार आहे. बिचारी अगोदरच लाजून पळाली. म्हणाली मात्र, वाऱ्याच्या भीतीने पळाले.

ऐन मध्यरात्री, विजा, वारा नि पाऊस यांच्या कल्लोळात ज्ञानदेवाने जन्म घेतला.

तो दोन वर्षांचा होतो ना होतो, तोच सोपान आला आणि त्याची पाठ धरून आणखी दोन वर्षांनी आली मुक्ता !

या चार बाळांच्या रूपाने जणू चार वेदच विठ्ठल-पंतांच्या घरात बागडू लागले.

□ □ □

## आई गेली, बाप गेला

हळुहळू मुले मोठी झाली. माता-पित्यांची सेवा करू लागली. त्यांच्या दुःखावर फुंकर घालू लागली अन् त्याच वेळी आपल्या वेदना-यातना लपवू लागली. समजूतदारपणा, शांतता, निग्रह, विद्यार्जनातले प्रावीण्य, कष्टाळूपणा, क्षमावृत्ती हे सारे सद्‌गुण समूर्त होऊन निवृत्ती-ज्ञानदेव-सोपान आणि मुक्ताई यांच्या ठिकाणी नांदत होते.

मुलांच्या जन्मामुळे विठ्ठल–रखुमाई यांच्या अंत-रात आनंदा–उमेदीच्या फुलवेली फुलल्या असल्या, तरी त्याचमुळे आळंदीनिवासी ब्रह्मवृंदांचा मस्तकशूळ उठला होता. या ब्राह्मणाने केवळ संन्यासोत्तर संसारच मांडला नाही, तर मुलाबाळांचा पसाराही वाढवला, हा त्यांच्या दृष्टीने एक घोर गुन्हा होता आणि या गुन्ह्यातून मुक्त

व्हायचे तर एकच प्रायश्चित्त होते, ते म्हणजे देहांत प्रायश्चित्त !

आपल्या तीन मुलांच्या मौंजीबंधनाला संमती मागण्यासाठी विठ्ठलपंत शास्त्रीपंडितांच्या सभेत गेले, तेव्हा त्या ब्रह्मवृंदांनी एकमुखाने विठ्ठलपंतांना बजावले,

'तुमचा अपराध महाभयंकर आहे. त्याच्या क्षालनार्थ तुम्ही प्रथम देहांत प्रायश्चित्त घ्या. मगच तुमच्या मुलांच्या व्रतबंधासाठी शास्त्राधार धांडोळता येईल.'

अभागी विठ्ठलपंत ! आपल्या मरणाने तरी या सोन्यासारख्या अर्भकांची जीवने उजळतील अशा कल्पनेने त्यांनी ब्रह्मवृंदांची शिक्षा शिरोधार्य मानली आणि पत्नीसह प्रयागक्षेत्री जाऊन गंगायमुनांच्या संगमात देहविसर्जन केले.

आपल्या आई-वडिलांच्या देहपाताची ती कठोर वार्ता ऐकून, ज्ञानदेवादी भावंडांच्या कोवळ्या हृदयावर जणू वज्राघातच झाला. या जगात आपण पोरके आहो, ही कल्पना केवढी भयानक म्हणायला हवी ! निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई ही चारही भावंडे या आघाताने चांगलीच हादरली, क्षणकाल बावरली; पण दुःखाचा पहिला आवेग ओसरल्यानंतर थोडी सावरली.

आता त्यांना अगदी पहिले काम करायचे होते, ते म्हणजे स्वतःच्या मौंजीबंधनासाठी ब्रह्मवृंदांची, शास्त्री-

पंडितांची अनुमती मिळवण्याचे. त्यासाठीच त्यांच्या माता-पित्यांनी देहत्याग केला होता.

पैठण हे त्यावेळचे एक मोठे धर्मपीठ. तिथल्या ब्रह्म-वृंदांनी एखाद्या गोष्टीला संमती दिली, की ती गोष्ट सर्वत्र मान्य व्हायची. ज्ञानदेवाला हे ठाऊक होते. तो एके दिवशी निवृत्तीला म्हणाला,

'मला वाटतं दादा, आपण पैठणला जाऊ या.'

निवृत्ती उगाच बसला होता. तो उदासपणे म्हणाला,

'काय करायचं तिथं जाऊन ? कुठंही गेलो, तरी पळसाला पानं तीनच. आपण संन्याशाची मुलं. ब्राह्मण इथून तिथून सगळे सारखेच. धर्मशास्त्रातले नीतिनियम तेच वाचणार, तेच सांगणार. ते म्हणतील ते प्रमाण.'

'असं नको म्हणू दादा. ब्राह्मण म्हणजे भूदेव. समाजाचं धारण-पोषण त्यांनी करावं, ही धर्माज्ञा. अपराध घडला, तर त्यांनी शासन करावं, मार्गदर्शन करावं, हे त्यांचं कामच आहे. माझं ऐक तूं, आपले व्रतबंध व्हायला हवे. पैठणचा ब्रह्मवृंद सूज्ञ आहे, आपल्या माता-पितरांच्या अपराधासाठी तो आपल्याला शासन करणार नाही. आपल्या व्रतबंधाला संमती देतील ते.'

'तुला खरं सांगू ज्ञाना, व्रतबंधासाठी आपण एवढा आग्रह धरावा असं नाही वाटत मला. आपण निरपराधी आहो, असं ब्राह्मणांना वाटत असतं, तर आई-बाबांच्या

देहपातानंतर त्यांनी आपल्याला तत्काळ संमती दिली नसती का? पैठणच कशाला, या आळंदीत काय कमी गाढे विद्वान आहेत? पण त्यांच्या मते आपण अपराधी आहोत, मौंजीबंधन करून घ्यायला अपात्र आहोत.'

'ते ठीक आहे. पण तरीही मला वाटतं, आपण पैठण गाठावं. तिथल्या शास्त्री-पंडितांना विनवावं, सारं काही समजावून सांगितलं, तर निघेल काहीतरी मार्ग.'

'तुझा आग्रहच असेल, तर जाऊ; पण माझं मन घेत नाही.' निवृत्ती नाखुशीने म्हणाला.

□ □ □

# आता सांभाळी विठ्ठला

—आणि ती चार भावंडे पैठणची दिशा घेऊन चालू लागली. उजाड माळ. माथ्यावर जळणारा सूर्य. पायतळी तापलेला फुफाटा. वाटेला झाड नाही की झुडुप नाही. दूरवर काळी-कबरी घोंगडी लपेटून बसलेले डोंगर. बाकी सारा शुकशुकाट. असा मैलोगणती रस्ता मागे पडला. मग थोडी झाडी आली. एखादुसरा निर्झर खळाळताना दिसू लागला.

'दादा, मला तहान लागली रे!' लहानगी मुक्ता म्हणाली.

निवृत्ती मागे वळून म्हणाला,

'कोण मुक्ता का ग ? थांब हं, इथं जरा दिसतोय. आपण सगळेच जरा बसू. विसावा घेऊ. उन्हातून आल्यावर एकदम पाणी पिऊ नये बाळा.'

त्याच्या स्वरातली कोवळीक मुक्ताला जाणवली. ती एकदम त्याला बिलगली. ज्ञानदेवाने सोपानाला कवेत घेतले. त्याबरोबर त्याला कंठ फुटला. तो ज्ञानदेवाच्या गळ्यात हात टाकत म्हणाला,

'अजून किती लांब आहे रे ते पैठण ?'

'आलं बरं बाळा जवळ !'

...ती दुपार अशी गप्पागोष्टी करीत, वाटचालीचे श्रम हलके करीत आणि रानफळांचा मेवा, झऱ्याचे पाणी यांच्या आहारावर घालवली. तिसऱ्या प्रहराचे गार वारे वाहू लागले, उन्हे शीतळ झाली, तेव्हा त्यांनी झपाझपा पावले उचलली.

—पैठण जवळ जवळ येत होते. दक्षिणगंगा गोदावरीचा जलप्रवाह मधूनच दृष्टिपथात येत होता, मधूनच डोंगरांच्या कुशीत, झाडीमंडळात लपत होता. धाकटी दोघे फारच थकली होती. निवृत्ती-ज्ञानदेवही दमून गेले होते; पण त्यांनी मुक्ता आणि सोपानाला पाठुंगळी घेतले होते. पायांखालची वाट झपाट्याने सरकत होती, सरत होती.

–अखेर पैठण आले. गोदावरीचे विशाल पात्र दृष्टीत भरले. तीरावरची असंख्य देवालये पाहून मन हरखून गेले. वाटचालीचे श्रम हलके झाले. थकवा तेव्हाच पळून गेला. गोदावरीच्या पवित्र तीर्थजळात सुस्नात झाल्यावर तर तनामनाला एक वेगळीच टवटवी, वेगळाच तजेला आला. काठावरच्या देवळारावळांतून देवदर्शन घेऊन, निवृत्ती आपल्या भावंडांसह एका भल्या गृहस्थाच्या ओटीवर येऊन टेकला. सुदैवाने ते शास्त्री होते.

निवृत्तीने त्यांना आपली सारी कहाणी सांगितली अन् अंती विनवले,

'कृपा करा, आणि आम्हाला इथल्या ज्येष्ठ-श्रेष्ठ पंडितांकडून शुद्धिपत्र मिळवून द्या.'

निवृत्तीची आणि त्यांच्या भावंडांची ती करुणकथा ऐकून शास्त्रीबुवांचे हृदय द्रवले, नेत्र पाझरले. ते भरल्या गळ्याने म्हणाले,

'काळजी करू नका.बरं बाळांनो. उद्याच धर्मसभा आहे. मी अवश्य तुमच्यासाठी शब्द टाकीन.'

निवृत्तीला हायसे वाटले. ज्ञानदेव किंचित हरखला. सोपान आणि मुक्ताईला नेमके काही कळले नाही; पण काही तरी चांगले घडणार आहे; हे आजोबा प्रेमळ आहेत, आळंदीच्या ब्राह्मणांसारखे दुष्ट, तुसडे नाहीत एवढे

वाटले. मुक्ता तर खुदकन् हसलीसुद्धा. फारा दिवसांनी या पोरक्या पोरांच्या मुद्रेवर स्मिताचे प्रकाशकिरण पसरले.

परंतु हा आनंद क्षणिक ठरला. दुसऱ्या दिवशी भरलेल्या शास्त्री-पंडितांच्या सभेत या भावंडांच्या शुद्धीकरणाचा आणि मौंजीबंधनाला द्यायच्या संमतीचा प्रश्न उपस्थित झाला, तेव्हा मोठी मोठी पागोटी धारण करणाऱ्या अन् जरीकाठी उपरणी–शालजोड्या अंगाखांद्यावर वागवणाऱ्या त्या धर्ममार्तंडांनी एकमुखाने निर्णय दिला,

'तुमच्या शुद्धीकरणाला शास्त्राधार नाही. अर्थातच तुम्हाला व्रतबंधाचाही अधिकार नाही.'

पंडितांचा हा निर्णय ऐकून त्या भावंडांची उरलीसुरली आशाही करपून–कोळपून गेली. तरीही निवृत्तीने कमालीच्या नम्रतेने आणि काकुळतीने विचारले,

'आम्हाला शुद्धीकरणाचा आणि व्रतबंधाचा मार्ग मोकळा नाही, असं म्हणता! मग आम्ही मुलांनी आता काय करावे? कोठे जावे? कृपा करून आम्हाला मार्गदर्शन करा ना!'

निवृत्तीच्या या उद्‌गारावर एक जाडे–गाढे पंडित उठले आणि म्हणाले,

'आमचं ऐकणार आहेस का पण? हो, तुम्ही संन्याशाची पोरे! जन्मतःच विरक्ती तुमच्या अंगी

बाणलेली ! तुमचे वडील काशीच्या यतीकडे राहिलेले ! तुम्हाला मार्गदर्शन कोण करणार हो ? शहाणे तुम्ही. बारा गावचे पाणी प्यायलेले !'

'असं म्हणू नका. आम्ही खरोखरच ज्ञानजिज्ञासू आहोत.' ज्ञानदेव कळवळून म्हणाला.

'अस्सं ! तर मग ऐक. तुम्ही मुंज करू नका, लग्न करू नका, प्रपंच मांडू नका. केवळ 'हरी' 'हरी' करा. गावभर भीक मागा नि उष्टे तुकडे चघळत जगा. समजलं ?'

'समजलं' अशा अर्थी मान हलवून ज्ञानदेव माघारा वळला. त्याच्या डोळ्यांतून अश्रुबिंदू ओघळले. कंठ दाटला. सोपान नि मुक्ता ही दोन लेकरे हिरमुसली. निवृत्ती सैरभैर झाला.

मुले माघारी वळून परत जाऊ लागली, तसा एक धटिंगण ब्राह्मण पुढे झाला आणि ज्ञानदेवाच्या दंडाला धरून विचारू लागला,

'काय रे पोरा, नाव काय तुझं ?'

'माझं नाव ज्ञानेश्वर !'

त्यावर तो ब्राह्मण खदखदा हसला. ढग गडगडावा तसा म्हणाला,

'काय नाव, तर म्हणे ज्ञानेश्वर. ज्ञानाचा ईश्वर काय तू ? तो समोरचा रेडा बघितलास ? पखाल घेऊन

चाललाय ! त्याचंही नाव ज्ञानेश्वर आहे. मला वाटतं, त्याच्या–तुझ्यात काहीच फरक नाही.'

'त्याच्या–माझ्यातच का ? तुमच्या–त्याच्यातही काही भेद नाही. आपणा कुणातच तसा भेद नाही. इथून–तिथून जीवतत्त्व एकच आहे. सर्वांभूती भगवंतच वास्तव्य करतो, नाही का ?'

'काय, काय म्हणालास ? सर्वांभूती भगवंत म्हणे ! अरे, ते तत्त्व झालं ! शास्त्रातलं ! व्यवहारात त्याचा काय उपयोग ?'

'असं कसं असेल ?'

'कसं असेल ? थांब तू. 'सर्वांभूती भगवंत' काय ? त्या रेड्याला मारले की तुझ्या अंगावर वळ उठतात का, ते पाहू काय ?'

'पाहा. उठतील, अवश्य उठतील !' ज्ञानदेव निग्रहाने बोलला.

–आणि काय आश्चर्य ! रेड्याच्या पाठीवर कोरडे ओढले, पण वळ उठले ज्ञानदेवाच्या पाठीवर.

ते दृश्य पाहून ब्रह्मवृंद चकित झाला. या मुलांच्या आध्यात्मिक अधिकाराची त्यांपैकी बऱ्याच जणांना कल्पना आली. पण काही दुष्टांचे अजून समाधान नव्हते. त्यांच्यापैकी एक जण पुढे झाला आणि म्हणाला,

'अहो ज्ञानेश्वर ? तुमचा अधिकार मोठा दिसतो. तुम्हाला अशक्य काय म्हणा ? तुमच्या सांगण्यावरून हा आमचा रेडा वेद बोलेल का ?'

'का नाही ? तुमची इच्छा असेल, तर तो वेद म्हणेलही !'

–आणि ज्ञानदेव पुढे झाला व त्या रेड्याच्या पाठीवर हात फिरवून म्हणाला.

'हे महिषश्रेष्ठा, या ब्रह्मज्ञांना तुझ्याकडून वेद ऐकायचे आहेत. त्यांची इच्छा पुरी कर बरे !'

ज्ञानदेवांची आज्ञा ती ! रेड्याने अस्खलीत स्वरांत एकामागे एक वेदातल्या ऋचा म्हणायला आरंभ केला आणि तो चमत्कार पाहून सारे पैठण गाव अवाक् झाले. सहस्र मुखांनी ज्ञानदेवाचे कौतुक करू लागले.

□ □ □

# माझा मराठाचि बोलु कौतुकें !

पैठणला रेड्यामुखी वेद बोलवले आणि त्या एका चमत्काराने ज्ञानदेवादी भावंडांची दैवरेखा उजळली. कालपर्यंत छळ करणारे आज स्तुती करू लागले. चेष्टा करणारे नमस्काराला वाकले. दुर्जन सुजन बनले. भजनी लागले. सोपान--मुक्ताला गंमत वाटली. निवृत्ती आणि

ज्ञानदेव मात्र अंतर्मुख झाले. आपण काहीतरी चमत्कार करावा आणि लोकांनी आपल्याला नमस्कार करावा, हे त्यांना बरे वाटले नाही. क्षणिक विजेचा चमकारा खरा नव्हे; अखंड प्रकाशाची पखरण करणारा मंद-शांत नंदादीप खरा, हे त्यांना ठाऊक होते. निवृत्ती ज्ञानदेवाला म्हणाला,

'ज्ञानदेवा, अशा चमत्कारांनी लोक क्षणभर दिपतील, पण त्यांना शाश्वत सुखाचा मार्ग कसा सापडेल?'

'दादा, मलाही हे पटतं. पण खरेच सांगतो, चमत्कार करावा म्हणून मी काहीच केले नाही. या गोष्टी त्या त्या वेळच्या गरजेतून घडतात. तुम्हाला आठवतं, मागे एकदा मुक्तानं मांडे खायची इच्छा प्रकट केली. मांडे करायचे भांडे आपल्याकडे नव्हते. गावकरी देईनात. मला राहवले नाही. त्या कोवळ्या, अजाण जीवाची एवढीही इच्छा आपण पुरी करू शकत नाही, याची खंत वाटली. म्हणून मी जठराग्नी प्रदीप्त करून माझ्या पाठीवर तिला मांडे भाजू दिले..... काल परवा रेड्यामुखी वेद बोलवण्याचा प्रकार केला तो देखील सर्व प्राणिमात्र इथून तिथून एक आहेत, सर्वांच्या अंतर्यामी एकच भगवंत वास करतो, हे दाखवून देण्यासाठी. एरवी ही माणसे परस्परांचा द्वेष करतात, प्रसंगी जीव देखील घेतात. त्यांना समजावून नको का सांगायला?'

'सांगायला हवं ! अवश्य सांगायला हवं ! संस्कृत भाषेच्या कडी-कुलपात बंदिस्त होऊन पडलेलं अपार ज्ञानधन केवळ चमत्कारांना नमस्कार करणाऱ्या या भोळ्या भाबड्या जीवांसाठी आपण खुलं करायला हवं. लोक शहाणे व्हायला हवे, त्यांना शिकवायला हवे. त्यांच्यावर संस्कार करायला हवे आणि हे सगळं आईच्या मायेनं करायला हवं...'

'अगदी बरोबर बोललात, दादा. माझ्याही मनात नेमका हाच विचार वारंवार उसळी घेतो. आपण ज्येष्ठ आहात. माझे गुरू आहात. प्रत्यक्ष गहिनीनाथांचा आपल्याला अनुग्रह आहे. तुम्ही आज्ञा करा. मी आपल्या कृपाबळावर असा ग्रंथ लिहीन, की त्यांतली अक्षरे अमृताशी पैजा जिंकणारी असतील !'

ज्ञानदेव बोलत होता. त्याच्या मुखावर एक आगळीच प्रभा फाकली होती. निवृत्तीने ते पाहिले आणि तो म्हणाला,

'तू भगवद्गीतेवर मराठीत टीका लिही. लोकांना ज्ञानमार्ग, कर्ममार्ग समजावून सांग.'

ज्ञानदेवांनी हो म्हटले. पुढे ही भावंडे फिरत फिरत नेवाशाला आली. नेवासे ! मोहिनीराजाच्या देवालयासाठी प्रसिध्द असलेलं. पण त्या देवालयात कोण थारा देणार ? निवृत्ती म्हणाला,

'आपण आपले गावाबाहेरच्या शिवालयात जाऊ. प्रवरेच्या काठावर.'

'छान! नामी कल्पना!' नदीकाठ म्हटले, की सोपान अन् मुक्ता खूष. दुपारच्या शांत वेळी नदीच्या प्रवाहात विरघळलेले ऊन पाहताना आणि त्या विरघळलेल्या उन्हात सुळुक झुळुक करणाऱ्या मासोळ्या बघताना ती दोघे रंगून जात.

तिसऱ्या प्रहरी त्या शिवालयात गावकरी येऊ लागले. या चार भावंडांचे वेश आणि मुखावरचे तेज पाहून त्यांना मोठा आदर वाटला. त्यांच्यापैकी एक वृद्ध आजोबा ज्ञानदेवाला म्हणाले,

'बाबा, एकादं देवाचं गानं फिनं तरी ऐकीव रे!'

ज्ञानदेव हसले. मागच्याच दगडी खांबाला टेकून, पद्मासन घालून बसले आणि म्हणाले,

'आजोबा, ऐका हं....'

—आणि एकामागे एक त्यांच्या मुखातून अमृतासारखे शब्द स्रवू लागले. श्रोत्यांच्या कानामनाची धणी पुरवू लागले.

'दिवसामागून दिवस चालले ऋतूंमागुनि ऋतू.' ज्ञानदेव एकापेक्षा एक बहारदार दृष्टांत देत आपली कथा सजवीत होते. लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत होत्या. नेवासेंच काय, भोवतालची पंचक्रोशी या असामान्य

सत्पुरुषाच्या वाणीने वेडावली. असे पुराण, असे काव्य, असे तत्त्वज्ञान, असा वाणीचा गोडवा, आजवर लोकांना ऐकायला--अनुभवायला मिळालाच नव्हता.

भगवद्गीतेच्या अठरा अध्यायांवर सुमारे नऊ हजार ओव्यांची टीका लिहून ज्ञानदेवांनी आपला ग्रंथ सिद्धीस नेला. ज्ञानेश्वरीच्या पसायदानात त्यांनी सर्व जनांच्या कल्याणासाठी, विश्वमंगलासाठी परमेश्वराची प्रार्थना केली. ते म्हणतात,

दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांच्छील तो तें लाहो । प्राणिजात ॥

□ □ □

## विठ्ठल विठ्ठल गजरीं !

ज्ञानेश्वरी सांगून संपली. लोकांना अमृताचे भोजन झाले. सच्चिदानंद बाबा नावाचे एक गृहस्थ रोज ज्ञानदेवांचे शब्दन् शब्द टिपून घेत. तो ग्रंथ ज्ञानदेवांनी निवृत्तीनाथांच्या चरणी समर्पण केला. मग विचारले,

'आणखी काय करू ?'

'एक कर. आपली परंपरा नाथपंथाची. त्या नाथपंथाचं तत्त्वज्ञान आणखी सोप्या शब्दांत तूच सांग. तू

अनुभवी आहेस. तुझ्या अनुभवाला येईल ते लोकांना विवरून सांग.

'मान्य.' ज्ञानदेव म्हणाले. आणि त्यांनी अनुभवामृत किंवा अमृतानुभव या नावाचा एक ग्रंथ लिहिला.

ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव. दोन ग्रंथ अत्यंत अमूल्य विचारांनी भरलेले. कधीही जुने न होणारे. या ग्रंथांनी ज्ञानदेवांना कीर्तिवंत केले. गावोगावी त्यांच्या कीर्तीचा परिमळ दरवळत गेला. पार पंढरीच्या वाळवंटात पोचला. तिथे शेकडो विठ्ठलभक्त आषाढी–कार्तिकेचे निमित्त साधून येत. विठुरायाचे डोळाभर दर्शन घेत. मग पंढरीच्या वाळवंटात टाळ–मृदंगांच्या साथीवर भजन-कीर्तनाचे फड उभारीत. दोनचार दिवस भक्ति-सुखाची लयलूट होई.

नामदेव हा तिथला असाच एक विठ्ठलभक्त. मोठा संत. 'सुंभाचा करदोटा। रकटयाची लंगोटी। नामा वाळवंटी। कीर्तन करी।।'– असे त्याचे वेडेबागडे ध्यान. पण अधिकार? 'नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग'–असा. जनी त्याची दासी. तीही विठ्ठल-भक्तीत रंगलेली. तिने एक दिवस नामदेवाला ज्ञानदेवाची थोरवी सांगितली. तिने वर्णिलेला ज्ञानदेव मग एक-सारखा नामदेवाच्या स्वप्नात येऊ लागला. या ज्ञानदेवाला

भेटले पाहिजे, उराउरी भेटले पाहिजे, असे त्याला वाटू लागले.

—आणि एक दिवस जनी धावत धावत येऊन सांगू लागली, 'अरे, तो आला आहे. चल, चल. माझा ज्ञानदेव आला बघ. निवृत्ती, सोपान, मुक्ता सगळी आलीत पाहा.'

नामदेव धावत बाहेर आला. शतजन्मांची नाती असावी, तसे दोघे कडकडून भेटले.

—आणि मग भक्तिभागीरथीला उधाण आले. नामदेव, चोखामेळा, सावता माळी, नरहरी सोनार, जनाबाई—शेकडो भक्त मंडळी खांद्यावर भगव्या पताका घेऊन अन् गळ्यात टाळ-मृदंग अडकवून तीर्थयात्रेला बाहेर पडली.

काशी, गया, प्रयाग, प्रभास, द्वारका, डाकोर, गिरनार—किती ठिकाणं सांगावी ? मार्गात कीर्तनं करावी, भजनं करावी, प्रवचनं करावी, नवनवे अभंग रचावे आणि ते गात धुंद होऊन नाचावे, असे चालले होते. एका भक्तिसुखापलिकडे काही नको होते. ते भक्तिसुख संतांच्या संगतीत पुरेपूर मिळत होते. आनंद होता.

□ □ □

# लागली समाधी ज्ञानेशाची !

अखेर यात्रा संपली. सर्व संतमंडळी पंढरीला परतली. आज ज्ञानदेव काही वेगळेच दिसताहेत. कुठे तरी हरवल्यासारखे. निवृत्तिनाथ त्यांना म्हणाले.

'ज्ञानोबा, आज तू कीर्तन कर.'

ज्ञानदेव उभे राहिले. गळ्यात तुळशीमाळा आहेत. कपाळी बुक्का आहे. सारा प्राकार भक्तमंडळींनी भरून गेला आहे. ज्ञानदेवांचे अमृतमधुर शब्द ऐकण्यासाठी प्रत्येकजण आसुसला आहे आणि ज्ञानदेव बोलताहेत–

'मंडळी, माझं जीवन माझ्या सद्‌गुरूच्या कृपेनं कृतार्थ झालं. आता मला करण्यासारखं काही नाही. तेव्हा

'आतां मी जाईन आपुलिया गांवा।
होईल विसावा सुखसागरी वो माय ॥'

ज्ञानदेवांचे हे उद्‌गार ऐकले मात्र; निवृत्तीच्या सह साऱ्यांना धक्का बसला. ज्ञानदेवांनी समाधी घेण्याचा आपला मनोदय बोलून दाखविला आणि त्यांनी सर्वांना विनंती केली,

'आम्हाला निरोप द्या.'

–आणि ज्ञानदेवांना निरोप देण्यासाठी मंडळी अलंकापुरीला आली–ज्ञानेश्वरांना मिरवीत, त्यांच्यावर फुले उधळीत.

इंद्रायणीच्या तीरावर, सिद्धेश्वराच्या सन्मुख एका अंधाऱ्या खोल गुंफेत ज्ञानदेव डोळे मिटून समाधी लावून बसले आहेत. बाहेर हजारो वारकरी आपले पाझरते डोळे पुसत उभे आहेत. सुवर्णपिंपळ सळसळतो आहे. मंद वारे वाहत आहेत. आता केवळ समाधिगुंफेची शिळा लावली, की ज्ञानदेवांचे ते रूपडे दृष्टीआड होणार ! कुणालाच हे घडायला नको आहे आणि तरीही हे घडणार आहे. कारण हे एका महामानवाचे महाप्रयाण आहे.

—अखेर निवृत्तिनाथांनी शिळा लावली. हजारो कंठांतून एकच हुंदका फुटला. नामदेव गदगदत्या सुरात म्हणाला,

‘ बांधल्या तळ्याचा । फुटलासे पाट ।
ओघ बारा वाट । वाहताती ॥ ’

—आणि ज्ञानदेव दृष्टीआड झाले.

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र ३९६ दिनांक ...
विषय बा.सा. क्र. ...
BVBK-0400396

## बालवाङ्मय

**साने गुरुजी**

| | | |
|---|---|---|
| मुलांसाठी फुले | ... | ०–८० |
| सुंदर कथा | ... | १–०० |

**यदुनाथ थत्ते**

| | | |
|---|---|---|
| मधुराणी | ... | ०–८० |

**सौ. विमल काळे**

| | | |
|---|---|---|
| ब्रह्मदेवाची फजिती | ... | ०–८० |

**इंदिरा कापडी**

| | | |
|---|---|---|
| सावकाराची फजिती | ... | १–०० |

**मो. मा. वाळिंबे**

| | | |
|---|---|---|
| संत ज्ञानेश्वर | ... | १–२० |

**चंद्रकांत वेऊळगावकर**

| | | |
|---|---|---|
| सोनिया | ... | १–०० |
| परोपकारी विठू | ... | १–०० |

**भाल कोरगावकर**

| | | |
|---|---|---|
| मराठ्यांच्या वीरकथा | ... | १–०० |
| असें झुंजले वीर मराठे | ... | १–०० |

**सौ. पुष्पा महाबळेश्वरकर**

| | | |
|---|---|---|
| बाळभक्त प्रल्हाद | ... | १–०० |
| बाळभक्त ध्रुव | ... | १–०० |

**दिलीप कुंभोजकर**

| | | |
|---|---|---|
| जाड्या आणि रड्या | ... | ०–८० |

**पंढरीनाथ रेगे**

| | | |
|---|---|---|
| बाल इसापनीती | ... | १–०० |

**पु. पां. गोखले**

| | | |
|---|---|---|
| गोखल्यांच्या गोष्टी | ... | ०–६० |
| भले भले हे साने गुरुजी | ... | १–०० |